R.No. MHAMAR/25/A3029

R.No. MHAMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ९६

दि.२७ मार्च २०२६,वार: शनिवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## नागरिकांच्या तक्रारी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी-आ.रमेशअप्पा कराड




लातूर - टंचाईच्या उपाययोजना तात्काळ कराव्यात, मंजूर असलेल्या रस्त्याची कामे जलद गतीने सुरू करा, स्वस्त धान्य दुकानातील धान्याचा काळाबाजार खपवून घेणार नाही, कोट्यावधी खर्चाच्या पाणीपुरवठा योजनेचा उद्देश नागरिकांना शुद्ध पाणीपुरवठा करून सफल करावा आणि विविध वैयक्तिक लाभाच्या योजनेच्या तक्रारी येणार नाहीत याची संबंधितांनी काळजी घ्यावी अशी सूचना या बैठकीत आ. रमेशअप्पा कराड यांनी केली.

रेणापूर तालुक्यातील विविध विकास कामाचा आढावा आ. श्री. रमेशअप्पा कराड यांनी रेणापूर येथील पंचायत समिती सभागृहात शुक्रवारी घेतला या बैठकीस रेणापूर - औसा उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार प्रशांत थोरात, पंस सभापती सौ. मोनिका सूर्यवंशी, उपसभापती शरद दरेकर, रेणापूरच्या नगराध्यक्ष श्रीमती शोभाताई अकनगिरे, गटविकास अधिकारी सुमित जाधव, जिप बा. उप अभियंता एस. जी. कुलकर्णी, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उप अभियंता वाहेद देशमुख, गटशिक्षणाधिकारी कृष्णा भराडिया, महावितरण चे उप अभियंता काळे, तालुका आरोग्य अधिकारी श्रीधर रेड्डी, बालविकास प्रकल्प अधिकारी उज्वला देशपांडे, पुरवठा विभागाच्या नायब तहसीलदार लांडगे यांच्यासह महेंद्र गोडभरले, अनिल भिसे, दशरथ सरवदे, पंचायत समितीचे सदस्य विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, उपस्थित होते.

सदर बैठकीत आ. श्री. रमेशअप्पा कराड यांनी विविध विभागातील कामकाजाचा आढावा घेताना कामाची कुचराई करणाऱ्या कर्मचाऱ्यांसह अधिकाऱ्याची गय केली जाणार नाही असे सांगून गौण खणीज उत्खननाची चोरून विक्री होत असेल तर त्यावर क्शन घेण्यात यावी, कोट्यावधी रुपये खर्च करून त्या गावात नागरिकांना पाणीपुरवठा होत नसेल तर योजनेचा काय उपयोग असा प्रश्न उपस्थित करून संबंधितांनी त्यातील दोष अडचणी समजून घेऊन योजनेचा उद्देश सफल करावा असे बोलून दाखविले.

स्वस्त धान्य दुकानातून खातेधारकांना धान्य मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी आहेत गोरगरिबाचे धान्य काळ्या बाजारात जाणार असेल तर खपवून घेतले जाणार नाही असे सांगून आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, शासनाच्या वैयक्तिक लाभाच्या शेतकरी सन्मान योजना, लाडकी बहीण योजना, निराधारांच्या पगारी यासह विविध योजनेपासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये वैयक्तिक लाभाच्या योजनेबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी असून याबाबत खबरदारी घेऊन कोणाचीही अडवणूक आणि पिळवणूक होणार नाही याची काळजी घ्यावी असेही आ. रमेशअप्पा कराड यांनी बैठकीत बोलून दाखवले. या बैठकीस लोकप्रतिनिधी पदाधिकारी विविध गावचे सरपंच नागरिक उपस्थित होते.

## व्हॉलीबॉल उपांत्य फेरीत श्री वेताळेश्वर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी व विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय विजयी







लातूर - विश्वमैदान २०२६ व्हॉलीबॉल स्पर्धेतील उपांत्य फेरीत श्री वेताळेश्वर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी (एसव्हीएसएस), लातूर आणि विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (व्हीडीजीएमसी), लातूर या दोन्ही संघांनी दमदार विजय मिळवत अंतिम फेरीत धडक मारली असून, आता या दोन बलाढ्य संघांमध्ये विजेतेपदासाठी थरारक सामना रंगणार आहे.

माईर एमआयटी शिक्षण संस्था समूह, लातूर यांच्या वतीने आयोजित आंतर महाविद्यालयीन क्रीडा महोत्सवात व्हॉलीबॉल स्पर्धेस कै. बब्रुवान काळे मांजरा आयुर्वेदिक महाविद्यालय, लातूर (एमबीव्ही काळे) आणि एमआयपीटी फिजिओथेरपी महाविद्यालय, लातूर (एमआयपीटी) यांच्यातील सामन्याने सुरुवात झाली. या सामन्यात एमबीव्ही काळे संघाने प्रभावी सर्व्हिस, भक्कम बचाव आणि अचूक स्मॅशच्या जोरावर एमआयपीटी वर सरशी साधत विजयी सलामी दिली.

यानंतर जीएमसी आणि प्रयाग कराड कॉलेज ऑफ नर्सिंग, नांदगाव (पीकेसीएन) यांच्यातील सामना रंगला. जीएमसी संघाने सुरुवातीपासून आक्रमक खेळ करत प्रतिस्पर्ध्यांवर दबाव निर्माण केला. उत्कृष्ट ब्लॉकिंग आणि नेटजवळील नियंत्रणामुळे जीएमसी ने पीकेसीएन वर सहज विजय मिळवला.

तिसऱ्या सामन्यात एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय (एमआयएमएसआर) आणि एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाने (एमआयडीएसआर) यांच्यात जोरदार चुरस पाहायला मिळाली. दोन्ही संघांनी गुणांची अदलाबदल करत सामना रंगतदार केला. अखेर निर्णायक क्षणी एमआयएमएसआर संघाने संयम राखत विजय आपल्या नावावर केला.

चौथ्या सामन्यात एमआयएमएसआर समोर जीएमसी चे आव्हान उभे राहिले. हा सामना स्पर्धेतील सर्वाधिक उत्कंठावर्धक ठरला. दोन्ही संघांनी उत्कृष्ट बचाव आणि आक्रमणाचा सुरेख मिलाफ दाखवला. मात्र, शेवटच्या क्षणी जीएमसी संघाने निर्णायक गुण मिळवत सामना जिंकला आणि अंतिम फेरीत धडक मारली.

दिवसातील अखेरच्या सामन्यात एसव्हीएसएस आणि एमबीव्ही काळे आमनेसामने आले. एसव्हीएसएस संघाने सुरुवातीपासूनच आक्रमक भूमिका घेत प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व राखले. त्यांच्या समन्वयपूर्ण खेळामुळे एमबीव्ही काळे संघाला पुनरागमनाची संधी मिळाली नाही आणि एसव्हीएसएस ने विजय मिळवत अंतिम फेरीत स्थान निश्चित केले.

या स्पर्धेतील अंतिम आणि सर्वात महत्त्वाचा सामना एसव्हीएसएस आणि जीएमसी या दोन ताकदवान संघांमध्ये रंगणार आहे. दोन्ही संघांनी आतापर्यंत उत्कृष्ट कामगिरी करत अंतिम फेरी गाठली असून, त्यांच्या खेळातील वेग, ताकद आणि तांत्रिक कौशल्य पाहता अंतिम सामना अत्यंत चुरशीचा आणि उच्च दर्जाचा होणार आहे.

या स्पर्धेसाठी पंच म्हणून श्री विक्रम पाटील व श्री मुनाळे यांनी काम पाहिले. स्पर्धेचे धावते संचनल श्री परमेश्वर सोनवणे यांनी केले. यावेळी एमआयटी शिक्षण संकुल व विविध वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व नागरिक मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

## प्रभावी संवाद कौशल्य आणि वक्तृत्व नेतृत्व विकासाची भक्कम पायाभरणी असते : डॉ. जयद्रथ जाधव



लातूर (प्रतिनिधी) : भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर द्वारा संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जिल्हास्तरीय युवक-युवती नेतृत्व विकास शिबीर' उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या शिबिरात प्रभावी संवाद कौशल्य आणि वक्तृत्व कला या विषयावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रसंगी प्रमुख वक्ते डॉ. ज्ञानदेव राऊत (मराठी विभाग, शहीद भगतसिंग महाविद्यालय, किल्लारी) यांनी आपल्या विस्तृत मार्गदर्शनात सांगितले की, संवाद हा केवळ माहिती देण्याचा मार्ग नसून तो व्यक्तिमत्त्व घडवण्याचा मूलभूत पाया आहे. प्रभावी संवादासाठी विचारांची स्पष्टता, भाषेवर प्रभुत्व, आत्मविश्वास आणि श्रोत्यांशी संवाद साधण्याची क्षमता अत्यंत महत्त्वाची आहे. युवकांनी वाचन, चिंतन आणि सतत सराव यांच्या माध्यमातून वक्तृत्व कौशल्य विकसित केले पाहिजे. आजच्या डिजिटल युगातही प्रत्यक्ष संवादाची ताकद कमी झालेली नाही; उलट योग्य संवादकौशल्य असलेला युवक समाजात नेतृत्वाची भूमिका प्रभावीपणे पार पाडू शकतो.ते पुढे म्हणाले, वक्तृत्व ही केवळ भाषण देण्याची कला नसून ती लोकांना प्रेरित करण्याची आणि योग्य दिशादर्शन करण्याची शक्ती आहे. नेतृत्व विकसित करण्यासाठी संवादातील प्रामाणिकपणा, संयम आणि सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना डॉ. जयद्रथ जाधव (मराठी विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, रेणापूर) म्हणाले की, आजच्या स्पर्धात्मक आणि वेगवान युगात युवकांनी केवळ शैक्षणिक ज्ञानावर समाधान मानू नये, तर ते प्रभावीपणे मांडण्याची कला आत्मसात करणे गरजेचे आहे. संवाद कौशल्यामुळे व्यक्तिमत्त्वाला परिपूर्णता येते आणि नेतृत्वगुणांना योग्य दिशा मिळते. जो युवक स्पष्ट, समंजस आणि प्रभावी संवाद साधू शकतो, तोच समाजात विश्वास निर्माण करून परिवर्तन घडवू शकतो.ते पुढे म्हणाले, नेतृत्व म्हणजे लोकांना जोडण्याची कला आहे, आणि ही कला संवादातूनच विकसित होते. युवकांनी भीती, संकोच दूर करून आत्मविश्वासाने विचार मांडण्याची सवय लावली पाहिजे. यामुळे त्यांच्यात निर्णयक्षमता, जबाबदारीची जाणीव आणि सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होते.

या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे, कार्यक्रमाधिकारी डॉ. केशव आलगुले, डॉ. प्रमोद चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.या शिबिराच्या माध्यमातून युवक-युवतींमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास, प्रभावी संवाद कौशल्य आणि वक्तृत्व कला विकसित होण्यास मोठी चालना मिळत असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

## लातूर शहरात चक्रवर्ती सम्राट अशोक यांची जयंती उत्साहात संपन्न.



लातूर -विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती, लातूर २०२६च्यावतीने शांती, अहिंसा आणि मानव कल्याणाचा जयघोष करणारे, सत्तेचा उपयोग प्रजेच्या उद्धारासाठी आणि नैतिक उत्थानासाठी असावा असा नवा आदर्श निर्माण करणारे, मानवासोबतच मुक्या प्राण्यांसाठीही दवाखाने उघडणारे, रस्ते, विहिरी आणि वृक्षारोपणासारखी लोक कल्याणकारी कामे करणारा पहिला 'कल्याणकारी राजा, भारताच्या तिरंग्यावरील 'अशोक चक्र' हे त्यांच्याच गतिशील आणि न्यायपूर्ण विचारांचे प्रतीक आहे. तथागत गौतम बुद्धांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या सम्राट अशोक यांच्या जयंतीनिमित्त लातूर शहरात डॉ.आंबेडकर चौक, बौध्द नगर, लातूर येथून प्रारंभ करून शाहु चौक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुतळा, गंजगोलाई, हनुमान चौक, बसस्थानक, गांधी चौक ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क पर्यंत भिक्खू पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली ६०० फुट पंचरंगी धम्म ध्वज मिरवणूक काढण्यात आली.

या पंचरंगी धम्म ध्वज मिरवणूकीचे आयोजन विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती, लातूर २०२६चे अध्यक्ष गोविंद महादेव कांबळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले होते.

या भव्य धम्मध्वज मिरवणूकीमध्ये लातूर शहर महानगरपालिकेचे नगरसेवक विनयजी जाकते, ब्ल्यू पँथरचे अध्यक्ष साधूभाऊ गायकवाड, भारतीय बौद्ध महासभेच्या आशाताई चिकटे, चिंटू गायकवाड, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, केशव कांबळे, सुशील चिकटे, राम कोरडे, मिलिंद धावारे, बंटी गायकवाड, रवी कांबळे, विकास कांबळे, प्रशांत माने, तुषार कांबळे, रामदास सोनवणे यांच्यासह आंबेडकरी चळवळीतील अनेक मान्यवर आणि बौद्ध उपासक उपासकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## संपादकीय...

### ‘पल्स-२०२६’ : महाराष्ट्राच्या वैद्यकीय क्षेत्राला दिशा देणारी महत्त्वपूर्ण परिषद!

महाराष्ट्राने आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांप्रमाणेच वैद्यकीय सेवेतही आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. आधुनिक वैद्यकीय शिक्षण, अत्याधुनिक रुग्णालये, संशोधन संस्था आणि कुशल डॉक्टर यांच्या बळावर राज्य देशाच्या वैद्यकीय व्यवस्थेत अग्रस्थानी आहे. या क्षमतेला जागतिक स्तरावर अधोरेखित करण्यासाठी २७ व २८ मार्च २०२६ रोजी ‘पल्स-२०२६’ पल्स (झणडङए) प्लॅटफॉर्म फॉर युनिफाइड लर्निंग, स्किल्स, हेल्थ अँड एज्युकेशन ही महत्त्वपूर्ण आंतरराष्ट्रीय वैद्यकीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. ही परिषद जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे होणार असून राज्यात वैद्यकीय क्षेत्राचा विस्तार होण्यासाठी ही एक महत्त्वपूर्ण परिषद ठरणार आहे.

राज्य शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या पुढाकारातून आयोजित होणारी ही परिषद वैद्यकीय शिक्षण, संशोधन, तंत्रज्ञान, वैद्यकीय सेवा व्यवस्थापन आणि वैद्यकीय पर्यटन यांना एकत्र आणणारा व्यापक मंच आहे. या परिषदेत देश-विदेशातील नामवंत डॉक्टर, संशोधक, वैद्यकीय शिक्षणतज्ज्ञ, वैद्यकीय क्षेत्रातील धोरणनिर्माते तसेच उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. आधुनिक वैद्यकीय व्यवस्थेतील आव्हाने आणि त्यावरील उपाय यावर सखोल चर्चा होण्यासाठी हे एक व्यासपीठ ठरेल.

महाराष्ट्राच्या वैद्यकीय क्षेत्राचा जागतिक लौकिक.- वैद्यकीय सेवा ही केवळ उपचारांपुरती मर्यादित नसून ती आर्थिक प्रगतीची मोठी संधीही ठरू शकते. जागतिक स्तरावर ‘मेडिकल टुरिझम’ म्हणजेच वैद्यकीय पर्यटनाचा वेगाने विस्तार होत आहे. कमी खर्चात दर्जेदार उपचार मिळण्याच्या दृष्टीने भारत आणि विशेषतः महाराष्ट्राकडे अनेक देशांचे लक्ष वेधले जात आहे. ‘पल्स-२०२६’ परिषद ही संधी अधिक प्रभावीपणे मांडण्याचे काम करणार आहे. महाराष्ट्रात वैद्यकीय शिक्षण संस्था, सुपर-स्पेशालिटी रुग्णालये आणि संशोधन केंद्रांची मोठी संख्या आहे. या क्षमतेचा उपयोग करून राज्याला जागतिक वैद्यकीय सेवेत एक प्रभावी केंद्र म्हणून विकसित करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. परिषदेकरिता जगभरातून २९०० पेक्षा जास्त तज्ज्ञ, जवळपास १३० नामांकित डॉक्टर्स, वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या संस्थांमधील अभ्यासक संशोधक येणार आहेत. या परिषदेत वगेवेगळी २० सत्रे आयोजित करण्यात आली आहेत.

वैद्यकीय वेलनेस पर्यटनासाठी ‘महाराष्ट्र ब्रँड’-‘पल्स २०२६’ परिषदेमार्फत महाराष्ट्राला वैद्यकीय वेलनेस पर्यटनाचे महत्त्वपूर्ण केंद्र बनविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. ‘महाराष्ट्र ब्रँड’ म्हणून वैद्यकीय पर्यटनाची ओळख निर्माण करण्यासाठी राज्यातील रुग्णालये, वेलनेस केंद्रे, संशोधन संस्था आणि पर्यटन क्षेत्र यांच्यात समन्वय निर्माण करण्यावर भर दिला जात आहे. यामुळे राज्यात वैद्यकीय सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक वाढणार आहे. त्याचबरोबर वैद्यकीय उपकरणे, जैवतंत्रज्ञान, वैद्यकीय तंत्रज्ञान आणि संशोधन यांसारख्या क्षेत्रांना नवी चालना मिळणार आहे. याचा थेट परिणाम रोजगारनिर्मितीवरही होईल.

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधनाला चालना- ‘पल्स-२०२६’ परिषदेत वैद्यकीय शिक्षणातील सुधारणा आणि संशोधनाला प्रोत्साहन मिळणार आहे. आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल हेल्थ, रोबोटिक सर्जरी, टेलीमेडिसिन यांसारख्या नव्या संकल्पना वैद्यकीय शिक्षणात कशा समाविष्ट करता येतील यावर या परिषदेत सखोल चर्चा होणार आहे. आज वैद्यकीय क्षेत्र अत्यंत वेगाने बदलत आहे. नव्या तंत्रज्ञानामुळे निदान आणि उपचार पद्धती अधिक अचूक आणि परिणामकारक होत आहेत. या पार्श्वभूमीवर वैद्यकीय शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे आणि विद्यार्थ्यांना आधुनिक ज्ञान व कौशल्ये उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक आहे. ‘पल्स-२०२६’ ही परिषद त्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. ‘डिजि होम’ आणि ‘टेक टॉक’ या विशेष संकल्पना सुद्धा या परिषदेत असतील. ३६० डिग्री डोममध्ये रोबोटिक सर्जरी, व्हर्च्युअल रिलिटीमध्ये मेडिकल प्रशिक्षण, डिजिटल हॉस्पीटल व्यवस्थापन यासारख्या तंत्रज्ञानाचे लाईव्ह आणि इमर्सिव्ह प्रेझेंटेशन सादर केले जाणार आहे.

ग्रामीण भागातील वैद्यकीय सेवेला लाभणार नवी दिशा-वैद्यकीय क्षेत्रातील विकास हा केवळ शहरांपुरता मर्यादित राहून चालणार नाही. ग्रामीण आणि दुर्गम भागात दर्जेदार वैद्यकीय सेवा पोहोचविणे ही मोठी गरज आहे. ‘पल्स-२०२६’ परिषदेमुळे ग्रामीण वैद्यकीय सेवेसाठी नव्या संकल्पना आणि उपाययोजना समोर येतील. टेलीमेडिसिन, मोबाइल हेल्थ युनिट्स, डिजिटल हेल्थ रेकॉर्ड्स आणि आधुनिक निदान तंत्रज्ञान यांच्या मदतीने ग्रामीण भागातही दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देता येऊ शकते. या तंत्रज्ञानांचा वापर कसा वाढवता येईल यावर परिषदेत चर्चा केली जाणार आहे. वैद्यकीय क्षेत्रातील नवकल्पनांचा संगम-‘पल्स-२०२६’ परिषद ही केवळ वैद्यकीय चर्चांपुरती मर्यादित नसून वैद्यकीय क्षेत्रातील नवकल्पनांचा संगम घडविणारा मंच ठरणार आहे. या परिषदेत स्टार्ट-अप्स, संशोधन संस्था, औषधनिर्मिती उद्योग, वैद्यकीय उपकरण उत्पादक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्या सहभागी होणार आहेत. यामुळे वैद्यकीय क्षेत्रातील नव्या कल्पना आणि संशोधनाला प्रत्यक्ष उद्योगाशी जोडण्याची संधी मिळेल. वैद्यकीय तंत्रज्ञानातील नवकल्पना समाजापर्यंत अधिक वेगाने पोहोचण्यासाठी अशा प्रकारच्या मंचांची आवश्यकता असते.भविष्याच्या वैद्यकीय व्यवस्थेचा आराखडा-आजच्या काळात वैद्यकीय व्यवस्थेसमोर अनेक आव्हाने आहेत. नवीन रोगांचे उद्भव, वाढते वैद्यकीय खर्च, तंत्रज्ञानाचा वेगाने होणारा विकास आणि लोकसंख्येच्या वैद्यकीय गरजा, या सर्वांचा विचार करून भविष्यातील वैद्यकीय व्यवस्थेचा आराखडा तयार करणे आवश्यक आहे.

# ‘जीवन प्रवास’ : जीवनमूल्यांचा सर्वांगीण वेध घेणारा प्रेरणादायी लेखसंग्रह

मराठी साहित्यात जीवनदृष्टी घडवणारे, मनाला स्पर्श करणारे आणि वाचकाला आत्मपरीक्षणास प्रवृत्त करणारे लेखसंग्रह नेहमीच विशेष मानले गेले आहेत; या परंपरेत ठळकपणे स्थान मिळवणारा ग्रंथ म्हणजे जीवन प्रवास हा होय. लेखक प्रा. देवबा शिवाजी पाटील यांनी या लेखसंग्रहाच्या माध्यमातून मानवी जीवनाच्या विविध पैलूंवर सखोल चिंतन करत, साध्या परंतु परिणामकारक भाषेत जीवनाचे तत्त्वज्ञान मांडले आहे. हा ग्रंथ केवळ विचार मांडणारा नाही, तर जीवन कसे जगावे, कसे समजून घ्यावे आणि कसे घडवावे याचे दिशादर्शन करणारा आहे. सुरुवातीपासून शेवटपर्यंत वाचकाला सोबत घेऊन जाण्याची लेखकाची शैली अत्यंत आत्मीय आणि संवादात्मक आहे, ज्यामुळे हा लेखसंग्रह केवळ वाचनापुरता मर्यादित राहत नाही, तर तो वाचकाच्या विचारविश्वात एक सकारात्मक परिवर्तन घडवतो.

पुस्तकाची सुरुवात ‘प्रवासाला निघण्याआधी’ या प्रस्तावनात्मक लेखाने होते आणि हाच भाग संपूर्ण ग्रंथाचा आत्मा ठरतो. लेखकाने अत्यंत नम्रतेने वाचकांशी संवाद साधत जीवनाचा खरा प्रवास हा तारुण्यातील जबाबदाऱ्यांपासून सुरू होतो, हा विचार मांडला आहे. उपदेश हा रेचक तेलासारखा असतो असे सांगत लेखक स्वतःला उपदेशक न मानता एक सहप्रवासी म्हणून उभा राहतो, ही बाब वाचकाच्या मनात विश्वास निर्माण करते. संत तुकाराम यांच्या जे जे आपणासी ठावे या उक्तीचा आधार घेत लेखकाने आपले लेखन हे ज्ञानाची वाटणी करण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न असल्याचे स्पष्ट केले आहे. या प्रस्तावनेतून पुस्तकाचा उद्देश स्पष्ट होतो, जीवनोपयोगी विचार वाचकांपर्यंत पोहोचवणे आणि त्यांना योग्य दिशा देणे.

‘जीवनप्रवास’ या लेखात लेखकाने जीवनाचे अत्यंत सुंदर आणि प्रभावी रूपकांद्वारे चित्रण केले आहे. जीवन हा धुळीने भरलेला रस्ता आहे, काट्यांनी भरलेला मार्ग आहे, तसेच आशेच्या रुळांवर धावणारी आगगाडी आहे, ही रूपके जीवनातील संघर्ष, अनिश्चितता, आशा आणि सहानुभूती यांचे वास्तववादी दर्शन घडवतात. सुख-दुःख यांचा समतोल राखणे, आनंदाने उन्मत्त न होणे आणि दुःखाने खचून न जाणे हा या लेखाचा मुख्य संदेश आहे. जीवनाकडे संतुलित दृष्टिकोनाने पाहण्याची प्रेरणा देणारा हा लेख संपूर्ण ग्रंथाचा पाया मजबूत करतो.

‘कर्तव्यकर्म’ या लेखात लेखकाने जीवनातील कर्तव्याची जाणीव आणि जबाबदारीचे महत्त्व स्पष्ट केले आहे. अधिकार आणि कर्तव्य हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, हा विचार आजच्या समाजात विशेष महत्त्वाचा वाटतो. कर्तव्यबुद्धी, शिस्त, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि चिंतेपेक्षा चिंतन करण्याची वृत्ती यामुळे जीवन अधिक सुलभ आणि यशस्वी होते, हा संदेश अत्यंत प्रभावीपणे मांडला आहे. या लेखातून व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत तत्त्वांचा उलगडा होतो.

या लेखसंग्रहातील मानसिक आणि भावनिक स्वास्थ्यावर आधारित लेख विशेष उल्लेखनीय आहेत. ‘आनंदाचे डोही आनंद तरंग’ या लेखात संत तुकाराम आणि संत ज्ञानेश्वर यांच्या विचारांचा आधार घेत आनंदाचे तत्त्वज्ञान स्पष्ट केले आहे. भूतकाळाच्या आठवणी आणि भविष्यकाळाची भीती यांपासून मुक्त होऊन वर्तमानात जगणे हीच खरी आनंदाची गुरुकिल्ली आहे, हा विचार जीवनाला दिशा देणारा आहे. सकारात्मक विचारसरणी आणि उत्साही मनोवृत्ती यामुळे जीवन अधिक सुंदर आणि समाधानकारक बनते, हा संदेश अत्यंत प्रभावीपणे पोहोचतो.

‘भित्यापाठी ब्रम्हराक्षस’ या लेखात भीतीच्या मानसिक परिणामांचे वास्तववादी चित्रण केले आहे. भीतीमुळे माणसाचा आत्मविश्वास कमी होतो, उत्साह संपतो आणि प्रगती थांबते, हे लेखकाने स्पष्ट केले आहे. भीतीवर मात करण्यासाठी सकारात्मक विचार, सतत कृती, चांगल्या सवयी आणि मनाची एकाग्रता यांचा अवलंब करणे आवश्यक आहे, हा संदेश अत्यंत प्रेरणादायी आहे. हा लेख वाचकाला धैर्याने जीवनाचा सामना करण्याची प्रेरणा देतो.

‘अहंकार नको – नम्रता हवी’ या लेखात मानवी स्वभावातील अहंकाराचे विविध पैलू उलगडले आहेत. संपत्ती, सत्ता, सौंदर्य, शिक्षण, नातेसंबंध अशा अनेक कारणांनी निर्माण होणाऱ्या अहंकाराचे वास्तववादी चित्रण करून लेखकाने नम्रतेचे महत्त्व अधोरेखित केले आहे. नम्रता ही व्यक्तिमत्त्वाची खरी शोभा आहे आणि तीच माणसाला समाजात आदर मिळवून देते, हा संदेश या लेखातून स्पष्ट होतो.

‘पैसा बचत’ या लेखात आर्थिक शिस्तीचे अत्यंत उपयुक्त मार्गदर्शन केले आहे. उत्पन्नाचे योग्य नियोजन, गरजांची प्राधान्यक्रमाने विभागणी आणि भविष्यासाठी बचत करणे यांचे महत्त्व लेखकाने सोप्या पद्धतीने स्पष्ट केले आहे. कुटुंब, आरोग्य, शिक्षण, वृद्धापकाळ आणि समाजकार्य यांसाठी स्वतंत्र नियोजन करणे ही कल्पना अत्यंत व्यवहार्य आणि उपयुक्त आहे. अंथरुण पाहून हातपाय पसरावेत हा संदेश आर्थिक शिस्तीचे सार सांगतो.

या लेखसंग्रहातील आध्यात्मिक विचारांची मांडणी देखील उल्लेखनीय आहे. ‘पूजा अर्चा’, ‘प्रार्थनामहती’, ‘श्रद्धेचे सामर्थ्य’ या लेखांतून मनाची शुद्धी, एकाग्रता आणि आत्मबल यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. पूजाप्रार्थनेमुळे मन स्थिर राहते, सकारात्मक ऊर्जा मिळते आणि संकटांना सामोरे जाण्याची शक्ती प्राप्त होते, हा विचार जीवनाला स्थैर्य देणारा आहे.

शेवटी ‘जीवनोपयोगी काही गोष्टी’ हा विभाग संपूर्ण ग्रंथाचा सारांश वाटतो. सकारात्मक विचार, लवकर उठण्याची सवय, आत्मविश्वास, संयम, क्षमा, चारित्र्य, निश्चय, व्यवहारज्ञान यांसारख्या गुणांचा समावेश करून लेखकाने सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचा मार्ग दाखवला आहे. आजचा दिवस आनंदात घालवायचा की दुःखात हे आपल्या हाती आहे हा विचार वाचकाला आत्मनियंत्रणाची जाणीव करून देतो.

या संपूर्ण लेखसंग्रहाची भाषा अत्यंत साधी, ओघवती आणि प्रभावी आहे. कोणत्याही क्लिष्टतेशिवाय गहन विचार मांडण्याची लेखकाची क्षमता उल्लेखनीय आहे. रूपकांचा प्रभावी वापर, संतवचनांचा संदर्भ आणि अनुभवाधारित मांडणी यामुळे लेख अधिक जिवंत आणि प्रभावी झाले आहेत. प्रत्येक लेख वाचकाला काहीतरी नवे शिकवतो आणि त्याच्या विचारप्रक्रियेला चालना देतो.

एकूणच, ‘जीवन प्रवास’ हा केवळ लेखसंग्रह नसून जीवनाचा सर्वांगीण वेध घेणारा, प्रेरणादायी आणि मार्गदर्शक असा ग्रंथ आहे. तो वाचकाला सकारात्मक विचार, शिस्तबद्ध आचरण, मानसिक संतुलन, आर्थिक शिस्त आणि आध्यात्मिक उन्नती यांचा समतोल साधण्याची प्रेरणा देतो. जीवन अधिक अर्थपूर्ण, आनंदी आणि यशस्वी बनवण्यासाठी हा ग्रंथ निश्चितच एक विश्वासार्ह आणि उपयुक्त साथीदार ठरतो.

**प्राचार्य डॉ. बालाजी लाहोरकर**

# बांधकाम कामगारांच्या कल्याणकारी योजनेच्या निधीवर दिवसाढवळ्या दरोडा?

देशातील सर्वात मोठा उद्योग धंदा म्हणजेच इमारत बांधकाम धंदा,(बिल्डिंग कॉन्ट्रक्शन) यावरच अवलंबून असतात ९४ प्रकारचे कच्चा माल पुरवठा करणारे उद्योग धंदे व ९४ प्रकारचे असंघटित कामगार कारागीर हे या धंद्याशी जोडले गेले आहेत. आणि ते सर्वच बहुजन समाजातील वंचित आणि अशिक्षित,अडाणी,भूमिहीन मजूर असतात.ते खेडे सोडून शहरात आलेले गरज असलेल्या समाजातील प्रमुख घटक म्हणजे मिळेल ते काम मिळेल ती मजूरी घेणारा समाज म्हणून ओळखल्या जातात. आपला आणि आपल्या कुटुंबाचा कसाबसा अर्धपोटी उपाशी राहून उदरनिर्वाह करणारा असंघटीत कामगार. आर्थिक,शैक्षणिक, सामाजिक वैद्यकीय दृष्ट्या अपंगत्व असलेला आणि गांव सोडून पोटभरण्यासाठी भटकणारा असा असंघटित नाका, कामगार,घरकामगार म्हणजेचं इमारत व इतर बांधकाम करणारा कामगार.याचं इमारत व इतर बांधकाम कामगारांच्या कल्याणकारी योजनेच्या निधीवर दिवसा ढवळ्या दरोडा टाकण्याचे काम सत्ताधारी पक्षाचे नगरसेवक,आमदार,खासदार आणि कार्यकर्ते करीत आहेत.

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांचे ध्येय उद्धेश आणि उद्दिष्ट हे कामगारांना कल्याणकारी योजनेची माहिती देऊन त्यांची नांव नोंदणी करून घेणे हे आहे.त्यासाठी त्यांनी महाराष्ट्र राज्य परिवहनाच्या म्हणजेच प्रत्येक गावात जाणाऱ्या एस टी वर तिन्ही बाजूला जाहिरात केली आहे. प्रत्येक डेपो,ग्रामपंचायत, पंचायत समिती मध्ये जाहिराती लिहून ठेवल्या आहेत.ते वाचून इमारत व इतर कामगार नांव नोंदणीसाठी जातात तेव्हा त्यांना समाधान कारक उतरे दिली जात नाही. कार्यकर्ते गेले तर कर्मचारी नाही असे उत्तर दिली जातात.असे असतांना ही करोडो रुपयांची जाहिरात करणारी मोबाईल येल्डी वाहनाची खरेदी करून काही ठिकाणी भाड्याने घेऊन फिरवली जात आहे. तोच पैसा कामगारांची नांव नोंदणी करणाऱ्या कार्यालयात कर्मचारी अधिकारी यांना साधन सामुध्री साहित्य उपलब्द करण्यासाठी खर्च करावा. आणि कामगारांच्या न्याय हक्क अधिकारासाठी लढणाऱ्या कामगार संघटनेला प्राधान्य देऊन इमारत व इतर बांधकाम कामगारांना जास्तीतजास्त कल्याणकारी योजनेचा लाभ द्यावा.आणि इमारत व इतर बांधकाम कामगारांच्या निधीवर दिवसा ढवळ्या दरोडा घालण्याची मानसिकता बदलावी.यासाठी राज्यातील अनेक संघटना आणि ९८ कामगार संघटनाची महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना स्वतंत्र कृती समिति सनदशिर मार्गाने रास्तवर जन आंदोलन करून आणि न्यायालयीन लढाई लढत आहे. पण खऱ्या कामगारांची दखल घेतली जात नाही. आणि पक्षाच्या वतीने कोणत्याही व्यक्तीचे नांव दिल्यास दहा मिनिटात नांव नोंदणी होऊन ओटीपी देऊन भांडयाचा लाभ दिला जात आहे.इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचा उद्धेश आणि उद्धिष्ट डोळ्यासमोर ठेऊन मंडळाचा कारभार सुरू नाही.ऑनलाईन ऑफ लाईन नोंदणी प्रक्रिया सुलभीकरण झाल्याचे विधान सभागृहात कामगार मंत्री महोदय सांगतात, इमारत व इतर बांधकाम कामगारांना माहिती खूप दिली जाते. पण नांव नोंदणी करतांना मध्ये येणारे झारीतील शुक्राचार्य दलाल,एजन्सी,भ्रष्टाचारी कर्मचारी यांचा बंदोबस्त होत नाही. तो सर्वच तालुका केंद्रावर उघड पणे भ्रष्टाचार करून बोगस नांव नोंदणीकरून भांडे वाटप करत आहे. बांधकाम कामगार संघटित नसल्यामुळेच ९३ टक्के असंघटीत कामगार,इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी योजनेच्या अनेक कल्याणकारी योजने पासून वंचित आहे.इमारत बांधकाम साईट वर कामगारांची खऱ्या अर्थाने नोंदणी झाली पाहिजे.ती कोणतीही संघटना करू शकत नाही. आणि कामगार संघटीत झाला तर मालक ठेकेदार सबलेबर सप्लायर,मुकादम या कामगारांची कामावरून आणि राहत्या ठिकाणावरून हक्कालपट्टी करतात.कामगार कार्यालयाचे अधिकारी त्याला मोबदला मलिदा मिळत असल्यामुळे नांव नोंदणीचे अभियान राबविण्यात असमर्थ आहेत.हे सत्य कोणीच नाकारू शकत नाही.कल्याणकारी योजनांच्या लाभ देण्याच्या पद्धतींत सुटसुटीतपणा आणणे आवश्यक असतांना त्याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही.इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी महामंडळाकडे सेस करातून मोठ्या प्रमाणात निधी जमा झाला आहे. तो कामगारांच्या श्रमाचा पैसा आहे तो राज्य किंवा केंद्राचा पैसा नाही.त्याचे योग्य पद्धतीने वाटप न होता जाहिरात बाजीवर आणि भांडे वाटपावर मोठ्या प्रमाणात खर्च करून प्रचंड भ्रष्टाचार होत आहे. म्हणूनच इमारत व इतर बांधकाम कामगारांच्या कल्याणकारी योजनेच्या निधीवर दिवसा ढवळ्या दरोडा?.घालण्याचे काम सत्ताधारी पक्षाच्या लोकप्रतिनिधी कडून केले जात आहे.ते थांबविण्यासाठी कामगार संघटना,स्वतंत्र कृती समिती प्रचंड जन आंदोलन करते,पण त्याची दखल शासन व प्रशासन घेत नाही. हा बांधकाम कामगार असंघटित असल्यामुळे तो संघटित होत नाही. आणि संघटित झाला तर प्रचंड जन आंदोलन उभे राहिल्या शिवाय राहणार नाही.

देशातील असंघटीत कामगारांना संघटीत करून न्याय हक्क व अधिकार मिळवून देणारे महात्मा ज्योतीराव फुले,रावबहादूर नारायण मेंघाजी लोखंडे हे आहेत त्यांनी त्यांनी १८८४ ते १८९० पर्यंत जो संघर्ष केला. त्यामुळेच कामगारांना रविवारची सुट्टी व आठ तास कामाची दिवटी मिळत आहे.आपल्या देशातील उच्चवर्णीयांना कोणालाही याची जाणीव आणि कणव नव्हती पण आपणं ज्या इंग्रजाना आपल्याला गुलाम केल अस म्हणतो त्यांनीच या बांधकाम व असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी मुंबई येथे पहिले कामगार कार्यालय स्थापन केले.त्यावेळचे लॉरड लाईड यांनी हे काम आपल्या निदर्शनात पूर्ण केले.त्यावेळी संपूर्ण भारतात एकच कामगार कार्यालय होते. त्यावेळेपासून कार्यालयाने आजतागायत यशस्वीरीत्या कामकाज केले आहे.१९२६ साली या कार्यालयाचे नाव बदलून संचालक. माहिती व कामगार इंनटिलिजनस असे ठेवण्यात आले.१९३९ साली कामगार कार्यालये विभाजन करण्यात आले.१९४७ साली मुंबई कामगार कार्यालयाची पुनर्रचना करण्यात आली.१९५३ साली कामगार कल्याण मंडळांची स्थापना होई पर्यंत हे कामकाज कामगार कल्याण यांच्यामार्फत कामगार आयुक्त पाहत होते. १९७९ साली कामगार कार्यालयाची फेररचना करुन तीन विभाग करण्यात आले. विविध कामगार कायदे करण्यात आहे.कामगार आयुक्त यांचेकडून एकूण २४ कामगार कायदे तयार करण्यात आले. त्यामधील १९ कायदे केंद्रीय कायदे व उर्वरित ६ कामगार कायदे हे राज्यसरकार यांच्या अखरितयाखाली आहेत. इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम,१९९६.इमारत व इतर बांधकामावर काम करणा-या कामगारांच्या सेवाशर्ती नियमित करण्यासाठी, त्याचप्रमाणे त्यांना सुरक्षा,आरोग्य,आणि कल्याणकारी योजना पुरविण्यासाठी व त्याशी निगडीत इतर सर्व बाबींच्या नियंत्रणासाठी हा अधिनियम अस्तित्वात आलेला आहे. ज्या आस्थापनेत गेल्या १२ महिन्यातील कोणत्याही एका दिवशी १० किंवा त्याहून अधिक बांधकाम कामगार किंवा इतर बांधकाम करणारे मजूर कामावर ठेवण्यात आलेले असतील, अशा सर्व आस्थापनांना हा अधिनियम लागू आहे.महाराष्ट्र शासनाने दिनांक ५ फेब्रुवारी २००७ रोजी जारी केलेल्या अधिसूचने अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) नियम, २००७ लागू केलेला आहे. त्याचप्रमाणे, दिनांक १ मी २०११ रोजी इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाची स्थापनाही केलेली आहे.यात कामगारांचे कमी आणि कर्मचारी दलाल एजंट यांचेच मोठे कल्याण झाले आहे.

कामगार नोंदणीसाठी गाव गल्ली वस्ती तालुका शहर राज्य देश यामधून विविध संघटना सेवाभावी संस्था,कामगार संघटना,युनियन राजकीय सामाजिक संघटना याची निर्मिती करण्यात आली त्यांना शासकीय नोंदणी करुन कामगारांना न्याय हक्क अधिकार मिळवून देण्यासाठी प्रबोधन करण्यासाठी कामगार योजनांचा प्रचार प्रसार करण्यासाठी शासनाने रजिस्ट्रेशन दिले होते.पण आता उलट झाले आहे.प्रत्येक कामगार संघटना, सेवाभावी संस्था, युनियन सामाजिक, राजकीय संघटना यांनी कामगारांना विविध योजना मिळवून देतो यासाठी शासनाकडून मिळणाऱ्या लाभातील आपला आर्थिक वाटा अगोदरच निश्चित केला आहे.जागोजागी कामगार नोंदणी करणारे दुकाने उघडून ठेवण्यात आली आहेत.कर्मचारी अधिकारी यांना जो जास्त कमिशन देईल तोच या असंघटीत कामगारांचे कामगार मेळावे घ्याला लागले आहेत. त्या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती त्या त्या जिल्ह्यातील सहाय्यक कामगार आयुक्त अधिकारी कर्मचारी आपली हजेरी लावत आहेत. त्यामुळेच असंघटीत इमारत व इतर बांधकाम कामगारांच्या कल्याणकारी योजनेचे लाभार्ती खरे कमी आणि बोगस जास्त होत आहेत.बोगस एक वेळा नांव नोंदी करू शकतो पण दुसऱ्यावेळी दलाल कर्मचारी आणि बोगस कामगार संघटना,सेवाभावी संस्था,राजकीय संघटना युनियन यशस्वी होऊ शकत नाही.कारण वर्ष भरात खऱ्या खुऱ्या कामगारांना आणि संघटनांना यांची माहिती झाली असते तेव्हा माझ्या सारखा कामगार प्रतिनिधी,पत्रकार,अभ्यासक यावर हे सर्व लिहू शकतो.म्हणूनच मी लिहतो की इमारत व इतर बांधकाम कामगारांच्या कल्याणकारी निधीवर सत्ताधारी पक्षाच्या लोकप्रतिनिधी कडूनच दिवसा ढवळ्या दरोडा टाकल्या जात आहे.याविरोधात इमारत व इतर बांधकाम कामगारासाठी काम करणाऱ्या कामगार संघटनांनी आणि खऱ्या कामगारांनी संघटित झाले पाहिजे.अन्यता एक दिवस हे कल्याणकारी मंडळ बंद पडल्या शिवाय राहणार नाही.

**सागर रामभाऊ तायडे**
**९९२०४०३८५९,भांडूप मुंबई.**
**अध्यक्ष - महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना स्वतंत्र कृती समिती.**

# अनुसूचित जातींचे अ,ब,क,ड वर्गीकरण : सामाजिक न्याय की शासनाचे सूक्ष्म षडयंत्र

भारतीय लोकशाहीत 'सामाजिक न्याय' हा केवळ शब्द नाही, तर तो संविधानाने दिलेला नैतिक आदेश आहे. पण हा आदेश प्रत्यक्षात किती पाळला जातो? अनुसूचित जातींना दिलेल्या आरक्षणाचा लाभ सर्व घटकांपर्यंत पोहोचतो का, की तो काही मोजक्यांच्याच हातात केंद्रित झाला आहे? या पार्श्वभूमीवर अ, ब, क, ड असे उपवर्गीकरण करण्याचा प्रस्ताव समोर येतो आणि एक अस्वस्थ करणारा प्रश्न उभा राहतो. हे खरोखरच न्यायाचा विस्तार आहे, की समाजातील एकजूट कमकुवत करण्याचा सूक्ष्म राजकीय प्रयोग? अनुसूचित जाती हा एकसंध, समरूपी गट आहे, ही कल्पना वास्तवाशी विसंगत आहे. या वर्गात सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक पातळीवर प्रचंड विषमता आहे. काही जातींनी शिक्षण, नोकरी आणि सत्तेच्या प्रवेशद्वारांवर आपली ठाम छाप निर्माण केली आहे; तर काही जाती अजूनही उपेक्षा, दारिद्र्य आणि संधीअभावी अंधारात चाचपडत आहेत. परिणामी, आरक्षणाचा लाभ काही मर्यादित गटांमध्येच केंद्रीत राहिल्याची टीका केवळ राजकीय नाही, तर सामाजिक वास्तवावर आधारित आहे. या पार्श्वभूमीवर वर्गीकरणाचा विचार पुढे येणे स्वाभाविक आहे.

वर्गीकरणाचे समर्थक एक मूलभूत तत्त्व मांडतात, समानता म्हणजे सर्वांना सारखे देणे नव्हे, तर ज्यांना जास्त गरज आहे त्यांना अधिक देणे. ही भूमिका सामाजिक न्यायाच्या मूळ तत्त्वाशी सुसंगत आहे. कारण आजही काही अनुसूचित जाती शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या मूलभूत संधींपासून वंचित आहेत. अशा परिस्थितीत, जर आरक्षणाचा मोठा वाटा आधीच सक्षम झालेल्या घटकांकडेच गेला, तर उर्वरित घटकांसाठी न्यायाची संकल्पना केवळ कागदावरच उरते. अ, ब, क, ड वर्गीकरणामुळे सर्वात मागासलेल्या घटकांना प्राधान्य मिळू शकते, आरक्षणाचे लाभ अधिक संतुलित रीतीने वाटले जाऊ शकतात आणि सामाजिक समावेशनाला खऱ्या अर्थाने चालना मिळू शकते. म्हणूनच काहींसाठी हे धोरण म्हणजे न्यायाच्या नव्या अध्यायाची सुरुवात आहे.




मात्र, या धोरणाकडे संशयाच्या नजरेने पाहणाऱ्यांची संख्या कमी नाही. त्यांचा सरळ आरोप आहे. हे वर्गीकरण म्हणजे अनुसूचित जातींच्या एकजुटीवर घाला घालण्याचा प्रयत्न आहे. इतिहास साक्षी आहे की, एकजूट असलेला समाज हा राजकीयदृष्ट्या प्रभावी असतो. त्यामुळे त्यात फूट पाडणे हे सत्ताधाऱ्यांसाठी सोयीचे ठरते. अ, ब, क, ड या वर्गीकरणामुळे जातींमध्ये स्पर्धा, असूया आणि संघर्ष वाढण्याची भीती व्यक्त केली जाते. याहून महत्त्वाचे म्हणजे वर्गीकरणाचे निकष कोण ठरवणार? त्यात पारदर्शकता असेल का? आणि सर्वात महत्त्वाचे राजकीय हस्तक्षेप टाळला जाईल का? हे प्रश्न अनुत्तरित राहिल्यास, हे धोरण न्याय नव्हे, तर नियोजित विभाजन ठरू शकते.

या प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयानेही महत्त्वपूर्ण भूमिका मांडली आहे. राज्यांना उपवर्गीकरणाचा अधिकार असला, तरी तो ठोस, वस्तुनिष्ठ आणि वैज्ञानिक आकडेवारीवर आधारित असला पाहिजे, असा स्पष्ट निर्देश न्यायालयाने दिला आहे. घटनेतील कलम १४ आणि १६ यांचा विचार करता, कोणतेही वर्गीकरण हे तर्कसंगत आणि न्याय्य असले पाहिजे. अन्यथा, ते घटनाबाह्य ठरू शकते. यातून एक गोष्ट स्पष्ट होते. भावना, राजकारण आणि घोषणांपेक्षा तथ्य आणि पुरावे अधिक महत्त्वाचे आहेत. या संपूर्ण वादात सर्वात महत्त्वाचा आवाज कोणाचा आहे? तर तो तळागाळातील समाजाचा. अनेक अत्यंत मागासलेल्या जातींना वाटते की, आरक्षणाचा लाभ त्यांच्या दारात कधीच पोहोचला नाही. त्यांच्यासाठी वर्गीकरण म्हणजे पहिल्यांदाच दिसलेली संधी आहे. पण दुसरीकडे, काही प्रगत घटकांना भीती वाटते की, त्यांच्या मेहनतीने मिळवलेल्या संधींवर गदा येईल. त्यामुळे हा संघर्ष केवळ धोरणात्मक नाही; तो अस्तित्व, ओळख आणि स्वाभिमानाचा संघर्ष बनतो.

कोणतेही धोरण त्याच्या उद्देशाने नव्हे, तर अंमलबजावणीने मोजले जाते. जर शासनाने पारदर्शकता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि निष्पक्षता यांचा अवलंब केला, तर हे वर्गीकरण खऱ्या अर्थाने सामाजिक न्यायाचे साधन ठरू शकते. पण जर त्यामागे मतांचे गणित, सत्तेची आकांक्षा आणि समाजात फूट पाडण्याचा हेतू असेल, तर हे धोरण लोकशाहीच्या आत्म्यालाच तडा देणारे ठरेल. या वादातून मार्ग काढण्यासाठी काही ठोस पावले आवश्यक आहेत. सर्वसमावेशक आणि अद्ययावत डेटा संकलन करावे. स्वतंत्र, निष्पक्ष आयोगाची स्थापना करणे. कालबद्ध पुनरावलोकनाची यंत्रणा आणि समाजातील विविध घटकांमध्ये संवाद आणि विश्वास निर्माण करणे. अनुसूचित जातींचे अ, ब, क, ड वर्गीकरण हा केवळ प्रशासकीय निर्णय नाही; तो भारतीय समाजाच्या नैतिकतेची परीक्षा आहे. जर हे धोरण खरोखरच सर्वात वंचित घटकांना न्याय देणार असेल, तर ते नक्कीच स्वागतार्ह आहे. पण जर ते समाजात फूट पाडण्याचे, राजकीय फायद्यासाठी वापरण्याचे साधन ठरणार असेल, तर त्याला ठाम विरोध करणे हीच खरी लोकशाही ठरेल. शेवटी, प्रश्न वर्गीकरणाचा नाही तर तो न्यायाच्या प्रामाणिकतेचा आहे आणि त्या प्रामाणिकतेची परीक्षा आता सरकारसोबतच संपूर्ण समाजालाही द्यावी लागणार आहे.

आज गरज आहे ती घोषणांची नाही, तर प्रामाणिकतेची. जर अ, ब, क, ड वर्गीकरणाच्या माध्यमातून खरोखरच सर्वात वंचित घटकांना न्याय मिळणार असेल, तर त्याचे स्वागत करण्यास कुणालाही हरकत नसावी. पण जर हा प्रयोग समाजातील एकजूट खिळखिळी करून राजकीय फायद्याची पायाभरणी करण्यासाठी रचला गेला असेल, तर तो लोकशाहीसाठी धोक्याची घंटा ठरेल. सत्ताधाऱ्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, वंचितांना न्याय देणे म्हणजे केवळ धोरण आखणे नाही, तर विश्वास निर्माण करणे आहे आणि जर हा विश्वासच ढासळला, तर वर्गीकरणाचे हे गणित केवळ कागदावरच राहील; पण समाजात निर्माण होणारी दरी मात्र पिढ्यानपिढ्या भरून निघणार नाही.

## रेणापूर तालुका क्रीडा संकुलाचे भाजपा नेते. आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते भूमिपूजन



लातूर - रेणापूर येथे नव्याने विकसित होत असलेल्या साडेतीन कोटी रुपये खर्चाच्या तालुका क्रीडा संकुलाचे भूमिपूजन भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते शुक्रवारी करण्यात आले.

रेणापूर येथे सुसज्ज क्रीडा संकुल उभे राहावे अशी रेणापूर तालुक्यातील विविध खेळातील खेळाडूंची अनेक दिवसांची मागणी प्रत्यक्षात कार्यान्वित होत असून या क्रीडा संकुलनासाठी आ. रमेशअप्पा कराड यांच्या प्रयत्नातून राज्य शासनाकडून ३ कोटी ३८ लाख रुपयाचा निधी मंजूर झाला आहे. या निधीतून कबड्डीचे चार मैदान, खो-खो खेळाचे दोन मैदान, बॅडमिंटन खेळाचा हॉल, कार्यालयीन इमारत, ४०० मीटर लांबीचा धावनपथ (रनिंग टेक), आणि कंपाउंड वॉल आदी कामे करण्यात येणार आहेत.

रेणापूर तालुका क्रीडा संकुलनाचे भूमिपूजन भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराडे यांच्या शुभहस्ते शुक्रवारी करण्यात आले याप्रसंगी तहसीलदार प्रशांत थोरात, सा. बा. विभागाचे उप अभियंता लक्ष्मण देवकर, पंस उपसभापती शरद दरेकर, रेणापूरच्या नगराध्यक्षा श्रीमती शोभा आकनगिरे, सह अभियंता प्रवीण पवार, तालुका क्रीडा अधिकारी सुरेंद्र कराड, भाजपाचे महेंद्र गोडभरले, ॲड. दशरथ सरवदे, अनिल भिसे, पंस सदस्या सौ. शितल राऊतराव यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आ. कराड यांनी तालुका क्रीडा संकुल कामाची माहिती जाणून घेतली आणि महत्वपूर्ण सूचना केले. याप्रसंगी लक्ष्मण यादव, रमेश कटके, अजय राठोड, निवृत्ती चिद्रे, ओम चव्हाण, नामदेव बोंबडे, डॉ. बाबासाहेब घुले, वसंत करमुडे, राम मोरे, संतोष चव्हाण, अच्युत कातळे, राजू आत्तार, अशोक राठोड, गणेश चव्हाण, श्रीकृष्ण पवार, मोहनराव सिरसाट, नारायण राठोड, उत्तम चव्हाण, गोपाळ पडिले, राजकुमार आलापुरे, श्रीमंत नागरगोजे, रामा चव्हाण, सुरेश बुड्डे, अजित पाटील, शिवाजी जाधव, सिद्धेश्वर मामडगे, राम बडे, लक्ष्मण खलंग्रे, हनुमंत भालेराव, राजू मानमोडे यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पंढरपूर-शेगाव (भूम परंडा मार्गे) नवीन रेल्वेमार्ग मंजूर करा खा ओमराजे निंबाळकर यांची लोकसभेत आक्रमक मागणी:




नवी दिल्ली: धाराशिव लोकसभेचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी लोकसभेत अत्यंत महत्त्वाचा आणि जनतेच्या जिव्हाळ्याचा प्रश्न प्रभावीपणे उपस्थित करत पंढरपूर-शेगाव नवीन रेल्वेमार्ग मंजूर करण्याची जोरदार मागणी केली. सोलापूर, धाराशिव आणि बुलढाणा या तीन जिल्ह्यांच्या दृष्टीने हा रेल्वेमार्ग अत्यंत महत्त्वाचा असून, तो महाराष्ट्रातील लाखो भाविकांच्या श्रद्धेशी निगडित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

लोकसभेत बोलताना खासदार निंबाळकर यांनी नमूद केले की, पंढरपूर विठ्ठल-रुक्मिणी मंदिर आणि शेगाव गजानन महाराज मंदिर ही महाराष्ट्रातील दोन प्रमुख तीर्थक्षेत्रे असून, येथे दरवर्षी कोट्यवधी भाविक दर्शनासाठी येतात. मात्र, या दोन्ही तीर्थक्षेत्रांना थेट रेल्वेने जोडणारा मार्ग नसल्याने भाविकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. प्रस्तावित रेल्वेमार्ग पूर्ण झाल्यास प्रवास अधिक सुलभ, जलद आणि सुरक्षित होईल, मराठवाडा विदर्भ व पश्चिम महाराष्ट्र रेल्वे मार्गाने थेट जोडला जाईल. ज्याचा फायदा सामान्य नागरिक आणि भाविकांना होणार आहे.

खासदार निंबाळकर यांनी या रेल्वेमार्गाचे महत्त्व केवळ धार्मिक पर्यटनापुरते मर्यादित नसून, तो सोलापूर, धाराशिव आणि बुलढाणा या जिल्ह्यांच्या सर्वांगीण विकासासाठीही अत्यंत उपयुक्त ठरेल, असे ठामपणे मांडले. या मार्गामुळे व्यापार, उद्योग, शेतीमाल वाहतूक आणि रोजगाराच्या संधींना चालना मिळणार असून, या मागास भागाच्या विकासाला नवी गती मिळेल, असे त्यांनी सांगितले.

तसेच, धाराशिव जिल्ह्यातील भूम आणि परंडा तालुक्यातील नागरिकांनी या रेल्वेमार्गासाठी अनेक वर्षांपासून सातत्याने लढा दिला आहे. 'रेल्वे संघर्ष समिती'च्या माध्यमातून जनतेने वेळोवेळी आंदोलने, निवेदने आणि पाठपुरावा करून ही मागणी जिवंत ठेवली आहे. या भागातील जनभावना अत्यंत तीव्र असून, सरकारने याची गांभीर्याने दखल घ्यावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने पंढरपूर-शेगाव रेल्वेमार्गाच्या सर्वेक्षणासाठी तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा व रेल्वेमार्ग मंजूर करावा , सर्वे क्षणाची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करावी अशी ठाम आणि आक्रमक मागणी खासदार ओमराजे निंबाळकर यांनी रेल्वे मंत्र्यांकडे केली.

तसेच, धाराशिव जिल्ह्यातील भूम आणि परंडा तालुक्यातील 'रेल्वे संघर्ष समिती', विविध शेतकरी संघटना आणि स्थानिक नागरिकांनी अनेक वर्षांपासून या रेल्वेमार्गासाठी सातत्याने लढा उभारला असून, वेळोवेळी निवेदने देत आणि पाठपुरावा करत ही मागणी जिवंत ठेवली आहे. या सर्वांनी प्रत्यक्ष भेटीगाठी आणि निवेदनांच्या माध्यमातून हा विषय माझ्याकडे मांडत रेल्वेमार्गासाठी जोरदार मागणी केली होती, अशी माहिती खासदार निंबाळकर यांनी दिली.

या मागणीमुळे सोलापूर, धाराशिव आणि बुलढाणा जिल्ह्यांतील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रेल्वे प्रश्नाला राष्ट्रीय स्तरावर वाचा फुटली आहे. आता केंद्र सरकार या संदर्भात कोणती ठोस पावले उचलते, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

# भाजपा नेते आ.रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते नवीन सेलू वस्तीच्या रस्ता कामाचे भूमिपूजन



लातूर – रेणापूर तालुक्यातील मौजे नवीन सेलू वस्तीला जोडणाऱ्या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांच्या शुभहस्ते शुक्रवारी झाले आ. कराड यांचे गावात आगमन होताच महिला भजनी मंडळासह ग्रामस्थांनी जोरदार स्वागत केले.

गेल्या अनेक दिवसापासून राज्य रस्ता ते नवीन सेलू वस्ती दरम्यानचा रस्ता मजबूत व्हावा अशी ग्रामस्थांची मागणी होती रस्त्याची अडचण लक्षात घेऊन आ. रमेशअप्पा कराड यांनी या कामासाठी ४० लक्ष रुपयाचा निधी जिल्हा नियोजन समिती योजनेतून मंजूर करून दिला.

सदरील मंजूर रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहाच्या वातावरणात शुक्रवारी झाले. याप्रसंगी तहसीलदार प्रशांत थोरात, गटविकास अधिकारी सुमित जाधव, जिप बांधकाम विभागाचे उपअभियंता सुभाष कुलकर्णी कनिष्ठ अभियंता सारिका जटाळ भाजपाचे महेंद्र गोडभरले, ॲड. दशरथ सरवदे, अनिल भिसे, डॉ. बाबासाहेब घुले, वसंत करमुडे, नामदेव बोंबडे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

आ. कराड यांचे गावात आगमन होताच फटाक्याची आतिषबाजी करत महिला भजनी मंडळानी टाळ मृदंगाच्या गजरात जोरदार स्वागत केले. भूमिपूजन कार्यक्रमाच्या निमित्ताने ग्रामस्थांशी संवाद साधताना सदरील रस्त्याचे काम दर्जेदार व्हावे अशी अपेक्षा व्यक्त करून नवीन सेलू वस्ती पासून सेलू पर्यंत जाणाऱ्या शिव रस्त्याचे काम येत्या काळात केले जाईल असे सांगून आ. कराड यांनी शुद्ध पाणीपुरवठ्यासाठी आरो प्लांट मंजूर करू असे बोलून दाखवले.

याप्रसंगी सेलूच्या सरपंच अर्चना बोंबडे, अजय शेळके, पुंडलिक सुडे, निवृत्ती चिद्रे, नानासाहेब माने, दिलीप चोथवे, दिलीप गौंड, गोपाळ पडिले, शालिक गोडभरले, सुरेश बुड्डे, प्रताप राऊतराव, गोविंद पनगुले, प्रल्हाद फुलारी, राजू मानमोडे, संगमेश्वर तत्तापुरे, अंबादास राठोड, राजू कांबळे, मनोहर सुरवसे, सोमनाथ फुलारी, मनोहर चित्ते, पवन बोंबडे, अभी येरेकर, प्रभू धोपटे, आबा भोसले, योगेश पनगुले, विष्णू मलवाड, अरुण बाळे, दिगंबर जाधव, संतोष बोळगे, सुमित पाटील, रणजीत पाटील, बानापुरे गुरुजी, मधुकर बसतापुरे, अंकुश मोटेगावकर, निखिल पनगुले, सोपान भोसले यांच्यासह अनेक जण होते.

# बॅडमिंटन स्पर्धेत विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे वर्चस्व



लातूर–माईर एमआयटी शिक्षण संस्था समूह, लातूर यांच्या वतीने आयोजित 'विश्वमैदान २०२६' आंतर महाविद्यालयीन क्रीडा महोत्सवात पहिल्याच दिवशी रंगलेल्या बॅडमिंटन स्पर्धेत विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने (व्हीडीजीएमसी) दमदार कामगिरी करत उपांत्य फेरीपर्यंत आपले वर्चस्व सिद्ध केले. साई कृष्णा आणि नेहाल शाह यांच्या उल्लेखनीय खेळाच्या जोरावर जीएमसी संघाने विविध गटांत विजयांची मालिका कायम ठेवली.

दुसरीकडे एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाने (एमआयडीएसआर) देखील गजानन वाघमोडे यांच्या नेतृत्वाखाली प्रभावी खेळ सादर करत अंतिम फेरीतील आपले स्थान निश्चित केले. त्यामुळे आता जीएमसी आणि एमआयडीएसआर यांच्यात अंतिम लढत रंगणार आहे.

स्पर्धेच्या प्रारंभी एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. यतिश कुमार जोशी आणि एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष खत्री यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व श्रीफळ वाढवून उद्घाटन करण्यात आले. यावेळी स्पर्धा संयोजिका डॉ. वर्षा सांगळे, सहसंयोजक डॉ. सुजित झाडके, डॉ. गोपाळ नागरगोजे, क्रीडा शिक्षक बालासाहेब शेप, प्रतिक्षा कसबे यांच्यासह आयोजन समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

पहिल्याच दिवसाच्या सामन्यांमध्ये वेग, अचूकता आणि कौशल्याचा उत्कृष्ट संगम पाहायला मिळाला. मुलांच्या एकेरी गटात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या साई कृष्णा यांनी श्री वेताळेश्वर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, लातूर (एसव्हीएसएस) च्या ऋतेश धवळे तसेच कै. बब्रुवान काळे मांजरा आयुर्वेदिक महाविद्यालय, लातूर (एमबीव्ही काळे) च्या आर्यन कलशेट्टी यांच्यावर मात करत आपली दावेदारी भक्कम केली. त्याच गटात एमआयडीएसआर च्या गजानन वाघमोडे यांनी एमआयपीटी फिजिओथेरपी महाविद्यालय, लातूर (एमआयपीटी) च्या सारंग देशमुख यांना पराभूत करून लक्ष वेधून घेतले.

मुलींच्या एकेरी गटात देखील चुरशीचे सामने रंगले. एसव्हीएसएस च्या रोहिणी पाचंगे यांनी प्रयाग कराड कॉलेज ऑफ नर्सिंग, नांदगाव (पीकेसीएन) च्या संभोधी कांबळे यांच्यावर विजय मिळवला. तर जीएमसी च्या नेहाल शाह यांनी एमआयडीएसआर च्या साक्षी भिसे आणि एलबीव्ही काळे च्या क्षितिजा यांना पराभूत करत प्रभावी खेळाचे दर्शन घडवले. एमआयपीटी च्या रिया पाटील हिनेही पीकेसीएन च्या संभोधी कांबळे हिच्यावर विजय मिळवत आपली छाप पाडली.

मुलांच्या दुहेरी गटात एमआयडीएसआर च्या गजानन वाघमोडे व शशांक सांगळे या जोडीने सलग दोन विजय मिळवत आपली ताकद सिद्ध केली. तर जीएमसी च्या साई कृष्णा व उत्कर्ष नांदगरे या जोडीनेही सातत्यपूर्ण आणि समन्वयपूर्ण खेळ करत विजयांची नोंद केली.

मुलींच्या दुहेरी गटात एमआयडीएसआर च्या सुम्या शास्त्री व अपूर्वा पानसकर यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजय संपादन केला. त्याचबरोबर जीएमसी च्या नेहाल शाह व प्रणिता जाधव या जोडीने एमआयपीटी आणि वसंतराव काळे होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय, लातूर (व्हीकेएचएमसी) संघांवर मात करत आपले वर्चस्व कायम राखले. पीकेसीएन च्या संभोधी कांबळे व दिपाली गरोळे यांनीही एक विजय मिळवत स्पर्धेत आपली उपस्थिती अधोरेखित केली.

मिश्र दुहेरी गटात एमआयडीएसआर च्या रोहित ऐतवाडे व सुम्या शास्त्री या जोडीने विजय मिळवून दमदार सुरुवात केली. मात्र या गटातही जीएमसी च्या नेहाल शाह व साई कृष्णा या जोडीने एमआयपीटी आणि एसव्हीएसएस संघांवर सलग विजय मिळवत आपला दबदबा कायम राखला.

पहिल्या दिवसाच्या स्पर्धेत जीएमसी संघाचे सर्व गटांमध्ये वर्चस्व दिसून आले, तर एमआयडीएसआर संघानेही तितकेच कडवे आव्हान उभे केले. त्यामुळे अंतिम सामन्यात या दोन बलाढ्य संघांमध्ये रंगणाऱ्या लढतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या स्पर्धेसाठी श्री अविनाश अडसुळ, श्री आशिष इंगोले, श्री कृष्णा अडसुळ, ऋषभ करंजकर आणि रमन सय्यद यांनी पंच म्हणून काम पाहिले. कार्यक्रमाचे धावते संचलन श्री परमेश्वर सोनवणे यांनी केले. यावेळी एमआयटी शिक्षण संकुलातील विद्यार्थी, विविध वैद्यकीय महाविद्यालयांतील खेळाडू, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हैदराबादच्या धर्तीवर लातूरमध्ये भव्य ७५ फूट डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक उभारण्याची एकमुखी मागणी



लातूर□लातूर शहरात उभारण्यात येत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य ७५ फूट स्मारकाबाबत सर्व समाज बांधवांकडून हैदराबाद येथील भव्य स्मारकाच्या धर्तीवरच लातूरमध्येही हुबेहूब आणि आकर्षक स्मारक उभारावे अशी एकमुखी मागणी पुढे आली असून या पार्श्वभूमीवर भिक्खू पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व समाज बांधवांच्यावतीने लातूर महानगरपालिका आयुक्त मानसी मीना यांना निवेदन देण्यात आले.

लातूर शहरातील आंबेडकर पार्क येथे प्रस्तावित असलेल्या स्मारकाबद्दल समाजात आनंद व्यक्त करण्यात आला असला, तरी त्याच्या नियोजनाबाबत काही महत्त्वाच्या सूचना आणि मागण्या देखील मांडण्यात आल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रस्तावित स्मारका संदर्भात पालिका प्रशासनाने समाजातील तज्ज्ञ, अभ्यासू, अनुभवी व्यक्तीसोबत चर्चा न करता, स्मारकाचा प्रारूप आराखडा सार्वजनिक न करता निविदा काढून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करणे हे अनाकलनीय आहे. स्मारक हे सुंदर आकर्षक भव्य करणे हे महत्वपूर्ण आहे. महाराष्ट्रात इंदू मिल नंतर लातूर शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक उभे राहत आहे. त्यामुळे या बाबतीत राज्य सरकार आणि लातूर मनपाने गांभीर्याने या स्मारकाचे काम उत्कृष्ट आणि भव्य करण्याची तत्परता दाखविणे गरजेचे आहे.

निवेदनात स्पष्ट करण्यात आले की, ७५ फूट स्मारकाचा संपूर्ण आराखडा, डिझाईन व मंजुरी प्रक्रिया सर्वांसमोर पारदर्शकपणे मांडण्यात यावी. तसेच सध्या स्मारक एका बाजूस उभारण्याऐवजी ते पार्कच्या मध्यवर्ती ठिकाणी उभे करण्यात यावे, जेणेकरून त्याची भव्यता अधिक प्रभावीपणे दिसून येईल.स्मारकासाठी प्रस्तावित मनपाने आरक्षित केलेली जागा अपुरी असल्याचे नमूद करत अतिरिक्त जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी करण्यात आली. चबूतरा उत्तर व दक्षिणेकडील रस्त्यांपेक्षा किमान २० फूट उंच असावा, तसेच परिसरात आकर्षक उद्यान, फिरण्यासाठी जागा आणि सुंदर मार्बलमध्ये काम करण्यात यावे, अशीही सूचना करण्यात आली.याशिवाय स्मारकाच्या एकूण खर्चापैकी १० कोटी रुपयांचा विकास निधी उपलब्ध झाला आहे परंतु तो निधी एकूण कामासाठी अपुरा असून उर्वरित निधी राज्य सरकारने तात्काळ उपलब्ध करावा.

पूर्ण आराखडा व निधी मंजूर झाल्याशिवाय अर्धवट काम सुरू करणे योग्य नसल्याचे मत व्यक्त करत, काम रखडणार नाही याची लेखी हमी देण्याची मागणी करण्यात आली.तसेच राज्य सरकार व महानगरपालिका प्रशासनाने तातडीने मा. पालकमंत्री यांच्या उपस्थितीत सार्वजनिक बैठक घेऊन सर्व शंका दूर करावयात आणि तोपर्यंत कामास स्थगिती द्यावी अशीही मागणीही करण्यात आली आहे. अन्यथा समाज बांधव व आंबेडकरी अनुयायांच्यावतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही यावेळी देण्यात आला.

यावेळी चंद्रकांत चिकटे, लक्ष्मण कांबळे, अशोक कांबळे, राजा माने, बसवंतप्पा उबाळे, अनंत लांडगे, विनोद खटके, प्रा.यू.डी. गायकवाड, नगरसेवक ॲड. आतिश चिकटे, नगरसेवक विनय जाकते, नगरसेवक सचिन गायकवाड, नगरसेवक मंगेश सोनकांबळे, नगरसेवक विकास वाघमारे, ॲड. आनंद सोनवणे, डी.एल.वाघमारे, मयुर बनसोडे, अभिमन्यू लामतुरे, अक्षय धावारे, ज्योतीराम लामतुरे, सुशील चिकटे, साधू गायकवाड, दिग्विजय गोडबोले, मिलिंद धावारे, आशा चिकटे, शोभा सोनकांबळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, डॉक्टर, वकील, प्राध्यापक आणि युवकांची लक्षणीय उपस्थिती होती.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभारणे ही लातूर शहराच्या वैभवात भर घालणारी अभिमानास्पद बाब असून ते सर्वांच्या अपेक्षांनुसार आणि भव्यतेने साकारावे अशीच सर्व समाजाची अपेक्षा आहे.

# मराठवाड्यातील वाढत्या शेतकरी आत्महत्या चिंतेचा विषय–खा.रजनीताई पाटील




केज/प्रतिनिधी–मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा चिंतनाचा विषय आहे.

कृषीप्रधान देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात ही बाब गंभीर आहे. सरकार सांगते आत्महत्या कमी झाल्या मात्र आत्महत्या वाढलेल्या आहेत

ओला दुष्काळ, अतिवृष्टी नापिकी या दुष्टचक्रात शेतकरी अडकला आहे.

मराठवाड्यात दुष्काळ आणि विदर्भ भागांतील हवामान बदल आणि अनियमित पावसाचा प्रश्न खरोखरच गंभीर आहे. कोरडवाहू शेतीवर अवलंबून असलेल्या या भागातील शेतकऱ्यांसाठी शाश्वत उपाययोजनांची नितांत गरज असल्याचे खा.रजनीताई पाटील यांनी

राज्यसभेत शेतकरी प्रश्नावर आवाज उठवला.

मराठवाडा हा सलग दुष्काळ आणि अतिवृष्टी अशा दोन्ही टोकाच्या हवामानाचा सामना करतो. त्यामुळे येथे हैदराबादच्या धर्तीवर एक विशिष्ट प्रादेशिक केंद्र (ठशसळेपरश्र उशपीीश`ष उठखऊ) असावे, अशी मागणी खा रजनीताई पाटील यांनी केली.अंतर्गत मराठवाड्यात आणि विदर्भात 'अखिल भारतीय समन्वित कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प गतीने पुढे गेले पाहिजे हा सवाल उभा केला.

# काँग्रेस प्रदेश सरचिटणीस आदित्य पाटील यांनी घेतली काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची भेट



केज/प्रतिनिधी–भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस मा. आदित्य दादा पाटील यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी आदित्य पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन खरगे यांचे स्वागत केले आणि विविध विषयांवर चर्चा केली.

या सदिच्छा भेटीदरम्यान महाराष्ट्र राज्यातील सध्याची राजकीय परिस्थिती, आगामी निवडणुकांचे नियोजन आणि पक्ष संघटनेच्या बळकटीकरणाबाबत सविस्तर चर्चा केली. आदित्य पाटील यांनी राज्यातील जनसामान्यांच्या प्रश्नांबाबत चर्चा केली.

राज्यातील आगामी राजकीय आव्हाने पेलण्यासाठी पक्षश्रेष्ठींकडून मिळणारे पाठबळ महत्त्वाचे ठरणार असल्याचे आदित्य पाटील यांनी मत व्यक्त केले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर – ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर – ४१३५१२ येथे प्रकाशित केले.